## प्रकरण - ४

# मानवी जीवनाचे खरे स्वरूप

**व**रकरणी निरीक्षण करणाऱ्याला मानवी जीवन म्हणजे खाणे, पिणे, कष्टणे आणि झोपणे याचे रहाटगाडगे आहे, असे वाटेल. वस्तुत: जीवनाला फार मोठा अर्थ आहे, फार गंभीर महत्त्व आहे. जीवन हा एक यज्ञ आहे. त्यामधील प्रत्येक लहान-मोठे कर्म म्हणजे ईश्वराला केलेले समर्पण आहे. या शरणागतीच्या भावनेने जर दिवसातील सर्व कर्मे केली, तर निद्रा ही समाधीशिवाय दुसरे काय असू शकेल ?

देहतादात्म्य हा मनुष्याचा फार मोठा दोष आहे. शरीराला सुस्थितीत ठेवण्यासाठी व आरामासाठी त्याने विविध वस्तू संग्रहीत केल्या आहेत. वयानुसार शरीराला क्षीणत्व आल्यावर सुद्धा तो वेगवेगळ्या उपायांनी त्याला सक्षम करायचा प्रयत्न करत असतो. परंतु मृत्यूला किती काळ थांबवता येईल ? जेव्हा यमराजाचा हुकूम येतो, तेव्हा प्रत्येकाला जावेच लागते. मृत्यूसमोर समाजातील स्थान, अभिमान आणि शक्ती सर्व अदृश्य होतात. हे लक्षात घेऊन, स्वत:चे परमात्मस्वरूप स्वसंवेद्य करण्यासाठी शरीर, मन आणि आत्मा शुद्ध आणि पवित्र राखून त्यांच्या योगे सर्व प्राणिमात्रांची सेवा करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे. सेवेचे माध्यम असलेल्या शरीराचे पोषण, रक्षण करणे आवश्यक आहे. परंतु लक्षात घ्या की, शरीर म्हणजे 'तुम्ही' नाही. हे शरीर 'तुम्ही' होऊ शकत नाही. **'तत् त्वम् असि'** हे वेदातील उच्चतम, पवित्रतम महावाक्य आहे. तू अविनाशी आत्मतत्त्व आहेस व या आत्मतत्त्वासाठी म्हणून तुम्हाला हे शरीर उपलब्ध आहे आणि म्हणून इथे व आत्ता परमेश्वराच्या साक्षात्कारासाठी आहुती म्हणून कोणत्याही क्षणी हे शरीर अर्पण करण्यासाठी तुम्ही तयार असले पाहिजे. या शरीरावरील तुमच्या स्वामित्वाचा उपयोग विश्वकल्याणासाठी करा. हे शरीर एक उपकरण, ईश्वरदत्त

साधन आहे, त्याचा सदुपयोग होऊ द्या.

ईश्वरप्राप्तीच्या ध्येयाची पूर्ती होईपर्यंत शरीराची दुखापतीपासून आणि विकलतेपासून रक्षा करणे हे तुमचे कर्तव्य आहे. हिवाळ्यात थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी लोकरीचे उबदार कपडे वापरतात, पण जेव्हा शीत ऋतू संपतो तेव्हा ते कपडे टाकून दिले जातात. त्याचप्रमाणे जेव्हा भौतिक जीवनाचे वारे सर्वथा निष्प्रभ होतात, तेव्हा स्थूल देहाची गरज नाहिशी होते आणि व्यक्तीला केवळ सूक्ष्म देहाची जाणीव असते.

पावसाळा येतो तेव्हा मुसळधार पावसामध्ये पृथ्वी व आकाश एक होतात. हा अतिसुंदर देखावा स्फूर्तीदायक असतो. या द्वारेच जणू सृष्टी तुम्हांला आपल्याशी एकरूप होण्याची शिकवण देत असते. यांतून तीन बोध घेता येतील : सृष्ट पदार्थांचे विनाशित्व, मानवाचे दास्यत्व आणि ईश्वराचे प्रभुत्व. ही सृष्टी म्हणजे पूजा सामुग्री आहे, मानव पुजारी आहे आणि ईश्वर पूज्य आहे. जीवन नावाचा खेळ यांच्याशी खेळला जातो.

मानवाने आनंद मानायला पाहिजे की, पुरुषोत्तमाने मानवाभोवती नित्यनूतन साधने त्याच्या सेवेसाठी उपलब्ध केली आहेत आणि हा पुरुषोत्तम विविध स्वरूपात मानवाकडून पूजाकार्य करून घेत असतो. त्याने परमेश्वराकडे नवनवीन संधी प्राप्त होण्यासाठी प्रार्थना करावी आणि त्याच्या हातांना मिळालेल्या संधीनी आनंदीत व्हावे. असा भाव अपरिमित आनंदाला कारणीभूत होतो आणि अशा आनंदाने ठायी ठायी भरलेले आयुष्य जगणे हेच परमसुख आहे.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत जे काही केले जाते, ते जणू काही ईश्वराची पूजा असल्याप्रमाणे पवित्र केले पाहिजे. ज्या प्रमाणे पूजेसाठी फक्त ताजी फुले खुडण्याची व त्यांना स्वच्छ व प्रफुल्ल राखण्याची काळजी घेतली जाते, त्याच प्रमाणे जी कर्मे शुद्ध व निष्कलंक आहेत, तीच करण्याचा अथक प्रयत्न केला पाहिजे.

जर दररोज हा दृष्टिकोन मन:चक्षूंसमोर ठेवला आणि त्यानुसार जीवन जगले तर ते प्रभूची प्रदीर्घ अखंड सेवाच ठरते. लवकरच 'मी' आणि 'तू'ची भावना लुप्त होईल. अहंभावाचा सर्व लेश नष्ट होईल. जीवन खरोखर 'हरिपरायण' होऊन जाईल. 'मी सेवक आहे, ही सृष्टी नैवेद्य आहे, देव हा पूज्य स्वामी आहे' - विचार, भावना व आचार यांत माणूस जेव्हा ही अवस्था गाठतो, तेव्हा माझे व तुझे यातील सर्व भेदभाव नाहीसे होतील.